Department of Agriculture

Government of Maharashtra

The World Bank assisted

# Hon. Balasaheb Thackeray Agribusiness & Rural Transformation (SMART) Project

## मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प



# शेतमालाच्या संभाव्य किंमतींचा अंदाज अहवाल

## (ऑगस्ट २०२६ साठी)

## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम व्यवस्थापन कक्ष, पुणे

## प्रकल्प अंमलबजावणी कक्ष –कृषी


(जुलै, २०२६ मध्ये प्रकाशित)

# मक्याच्या किमतींमध्ये वाढीचा कल


## ऑगस्ट २०२६ साठीचा किंमत अंदाज : रु. २१७० ते २४८० प्रति क्विंटल




मका हे आंतराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे अन्नधान्य पीक आहे. अमेरिका, चीन, ब्राझील, अर्जेंटिना आणि भारत या देशात मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. भारतात मका खरीप, रब्बी आणि उन्हाळी अश्या तिन्ही हंगामात घेतली जाते. प्रमुख मका उत्पादक राज्यांमध्ये मध्य प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश आदी राज्यांचा समावेश होतो.भारतात मक्याचा वापर हा मुख्यतः पोल्ट्री खाद्य, पशुखाद्य यासाठी केला जातो. या भारतात मक्याची मागणी, पुरवठा व उपभोग या घटकांमध्ये होणाऱ्या बदलाचा मक्याच्या किंमतीवर परिणाम होत असतो.





अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार सन २०२६-२७ मध्ये, जगात मागील वर्षाच्या तुलनेत २.० टक्के मक्याचे उत्पादन घट होण्याच्या अंदाज आहे.




अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार सन २०२६-२७ मध्ये, भारतात मागील वर्षाच्या तुलनेत १४.५४ टक्के मक्याचे उत्पादनात घट होण्याच्या अंदाज आहे.





केंद्र शासनाच्या कृषी विभागाच्या दुसऱ्या अग्रीम अन्नधान्य उत्पादन अंदाजानुसार राज्यात सन २०२५-२६ मध्ये एकूण मक्याचे उत्पादन मागील वर्षीच्या (२०२४-२५) तुलनेत २०.५५ टक्क्यांनी वाढ होण्याचा अंदाज आहे.





अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार मक्याची निर्यात २०२६-२७ मध्ये १.५० लाख मेट्रिक टन होण्याचा अंदाज आहे, जी २०२५-२६ च्या तुलनेत ४० % घट होईल असा अंदाज आहे.

इथेनॉल, कुक्कुटपालन आणि स्टार्च उत्पादकांकडून वाढलेल्या मागणीमुळेही निर्यातीत घट झाली आहे.




देशात चालू वर्षाच्या जून २०२६ मध्ये मक्याची आवक मागील वर्षीच्या जून २०२५ च्या तुलनेत ११७.२५ टक्क्यांनी वाढली आहे.




* माहे जुलै, २०२६ ची किंमत दि. १८ जुलै पर्यंतची आहे.

मागील तीन वर्षातील नांदगाव बाजारातील मक्याच्या ऑगस्ट महिन्यातील सरासरी किंमती पुढील प्रमाणे.

ऑगस्ट २०२३ - रुपये २०४५ प्रति क्विंटल
ऑगस्ट २०२४ - रुपये २५६६ प्रति क्विंटल
ऑगस्ट २०२५ - रुपये २१६८ प्रति क्विंटल


खरीप हंगाम २०२६-२७ साठी किमान आधारभूत किंमत (MSP) रु. २४१० प्रती क्विंटल जाहीर करण्यात आली आहे.

# मजबूत मागणीमुळे हरभरा दर MSP च्या जवळ राहण्याची अपेक्षा


## ऑगस्ट २०२६ करिता संभाव्य किंमती रु. ५,३१५ ते ५,७८५/ क्विंटल




**हरभरा:** हरभरा हे भारतातील मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि उपभोग असणारे डाळवर्गीय पिक आहे. जागतिक पातळीवर एकूण डाळ उत्पादनापैकी २० टक्के हिस्सा हरभऱ्याचा आहे. भारत, ऑस्ट्रेलिया, तुर्की, म्यानमार, पाकिस्तान आणि इथिओपियासह सहा देश जागतिक हरभरा उत्पादनात सुमारे ९० टक्के योगदान देतात. भारत हा हरभऱ्याचा प्रमुख उत्पादक देश असून जगातील एकूण उत्पादनात भारताचा वाटा सुमारे ७०-७५ टक्के आहे. भारतातील एकूण डाळ उत्पादनापैकी ४०-५० टक्के हिस्सा हरभऱ्याचा आहे. देशभरात हरभऱ्याचा वापर डाळ व बेसन या दोन्ही स्वरूपात केला जातो.





हरभरा हे रब्बी पिक असून त्याची पेरणी ऑक्टोबर ते नोव्हेंबर व काढणी मार्च ते एप्रिल या दरम्यान केली जाते. २०२५- २६ मध्ये भारतातील हरभरा उत्पादन १२५.१ लाख टनांपर्यंत वाढण्याचा अंदाज असून, मागील वर्षाच्या तुलनेत उत्पादनात सुधारणा झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील हरभरा उत्पादन ३३.२ लाख टनांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज असून, गेल्या सहा वर्षांतील हे सर्वोच्च उत्पादन असल्याने बाजारातील उपलब्धता वाढण्याची शक्यता आहे.




२०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीत भारतातील हरभरा आयातीत मोठे चढ-उतार दिसून आले. २०२४-२५ मध्ये आयात १६.१ लाख टनांपर्यंत वाढल्यानंतर २०२५-२६ मध्ये ती १०.१ लाख टनांवर घसरली, तर निर्यात सुमारे ३-४ लाख टनांच्या पातळीवर स्थिर राहिली. आयातीत झालेली वाढ देशांतर्गत पुरवठा मजबूत करण्यास सहाय्यक ठरली. आयातीत काहीशी घट झाली असली तरी ती **पूर्वीच्या वर्षांच्या तुलनेत अधिक असल्याने** देशांतर्गत बाजारातील पुरवठा समाधानकारक राहण्याची शक्यता आहे.




मार्च ते मे हा हरभऱ्याचा प्रमुख विक्री हंगाम असतो.वर्ष २०२५-२६ मध्ये भारतातील बाजारात हरभऱ्याच्या आवक मध्ये डिसेंबर महिन्यात उच्चांक गाठून त्यानंतरच्या महिन्यांमध्ये घट होत असल्याचे दिसून




२०२५-२६ हंगामात लातूर बाजारातील हरभरा दरांमध्ये हळूहळू सुधारणा होऊन जुलैमध्ये सरासरी दर ₹५,६५२ प्रति क्विंटल झाला, जो २०२६-२७ च्या ₹५,८७५ प्रति क्विंटल MSP पेक्षा किंचित कमी आहे. मजबूत मागणी आणि संतुलित बाजारपुरवठ्यामुळे आगामी काळात हरभरा दरांना आधार मिळून ते MSP च्या जवळ जाण्याची शक्यता आहे.

मागील तीन वर्षातील लातूर बाजारपेठेतील हरभऱ्याच्या ऑगस्ट मधील सरासरी किंमती खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| ऑगस्ट २०२३: | रु. ५,४०९/क्विंटल |
| ऑगस्ट २०२४: | रु. ७,१८९ /क्विंटल |
| ऑगस्ट २०२ : | रु.५,७३० /क्विंटल |


२०२६-२७ च्या रब्बी विपणन हंगामासाठी हरभऱ्याचा किमान आधारभूत किंमत (MSP) ₹५,८७५ प्रति क्विंटल निश्चित करण्यात आला आहे. सध्या बाजारातील हरभरा दर MSP पेक्षा कमी असून, बाजारातील पुरवठा व मागणीच्या परिस्थितीचा दरांवर प्रभाव दिसून येतो.

# तूर दर स्थिर ते किंचित वाढीच्या दिशेने


## ऑगस्ट २०२६ करिता तुरीच्या संभाव्य किंमती : ७,८००- ८,३९०/क्विंटल




**तूर:** भारत हा जगातील सर्वात मोठा तूर उत्पादक तसेच उपभोक्ता देश आहे. भारतातील तूर उत्पादनात महाराष्ट्र, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश राज्यांचा वाटा ६० टक्के पेक्षा जास्त आहे. तूरीच्या बाजारपेठेवर मागील वर्षातील तूर साठा, आयात तसेच चालू वर्षातील उत्पादन यांचा परिणाम होताना दिसतो. केंद्र शासनाने तूर निर्यातीसाठी खुली केली असून तूरीचा आयात कोटा मर्यादित ठेवलेला आहे.





तूर हे खरीप पिक असून त्याची पेरणी जून ते जुलै व काढणी डिसेंबर ते फेब्रुवारी या दरम्यान केली जाते. भारत सरकारच्या अंदाजानुसार, २०२५-२६ या वर्षात देशात तूरीचे उत्पादन सुमारे ३५.९२ लाख टन इतके राहण्याचा अंदाज असून ते मागील वर्षाच्या तुलनेत घट दर्शवते. तसेच महाराष्ट्रात तूरीचे उत्पादनात सुमारे ११.८ लाख टनांची लक्षणीय घट अपेक्षित असून, यामुळे राज्यस्तरावर पुरवठ्यात मोठी घट होण्याची शक्यता आहे.




२०२१- २२ ते २०२५-२६ या कालावधीत तुरीची आयात ८.४० लाख टनांवरून १४.८३ लाख टनांपर्यंत वाढली, तर निर्यात सुमारे ३-४ लाख टनांच्या पातळीवर स्थिर राहिली. वाढलेल्या आयातीमुळे देशांतर्गत पुरवठा मजबूत राहण्याची शक्यता असून, त्यामुळे मजबूत मागणी असली तरी तूर दरांवरील वाढीचा दबाव मर्यादित राहू शकतो.




भारतातील तुरीची आवक जानेवारी-फेब्रुवारीमध्ये उच्चांकावर पोहोचून त्यानंतर हळूहळू घटते. २०२५-२६ मध्ये आवक २०२४-२५ च्या तुलनेत जवळपास समान राहिल्याने उत्पादन व बाजारातील पुरवठा स्थिर असल्याचे दिसून येते. ऑगस्टमध्ये हंगामी कारणांमुळे आवकेत आणखी घट होण्याची शक्यता असून, त्यामुळे तूर दरांना आधार मिळण्याची अपेक्षा आहे.




लातूर बाजारातील तूर दरांमध्ये २०२५-२६ हंगामात मागील वर्षाच्या तुलनेत लक्षणीय सुधारणा दिसून आली आहे. जुलैमध्ये तूरचा सरासरी दर ₹ ८,०१८ प्रति क्विंटल राहून तो ₹ ८,००० प्रति क्विंटल MSP पेक्षा किंचित जास्त होता.

मजबूत बाजारमागणी, व्यापारी व प्रक्रिया उद्योगांची सातत्यपूर्ण खरेदी आणि संतुलित आवक यामुळे दरांना आधार मिळाला आहे. ऑगस्ट २०२६ मध्ये तूर दर स्थिर ते किंचित वाढीच्या दिशेने राहण्याची शक्यता आहे. मात्र, पुढील दरवाढ आवक, खरेदीची गती आणि देशांतर्गत पुरवठ्याच्या परिस्थितीवर अवलंबून असेल. मागील तीन वर्षातील लातूर बाजारपेठेतील तुरीच्या ऑगस्ट मधील सरासरी किंमती खालीलप्रमाणे:


ऑगस्ट २०२३: रु. १०१९४ /क्विंटल
ऑगस्ट २०२४: रु. १०,३३८ /क्विंटल
ऑगस्ट २०२५: रु. ६,४८६ /क्विंटल

खरीप हंगाम २०२६-२७ साठी सरकारने जाहीर केलेली किमान आधारभूत किंमतीपेक्षा (MSP रु.८४५०/क्विंटल) असून सध्याच्या तुरीच्या किंमती MSP च्या दिशेने जाताना दिसून येत आहे.


# मजबूत मागणीमुळे सोयाबीन दरात वाढ
# ऑगस्ट २०२६ : रु. ७,००० ते ७,५८५ प्रति क्विंटल




**सोयाबीन:** सोयाबीन हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे तेलबिया पिक आहे. अमेरिका, ब्राझील, आर्जेन्टिना, चीन व भारत या देशात सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. या प्रमुख देशातून जागतिक उत्पादनाच्या सुमारे ९० टक्के सोयाबीनचे उत्पादन होते. त्यामुळे या देशातील सोयाबीनची मागणी,पुरवठा व उपभोग या घटकामध्ये होणाऱ्या बदलाचा सोयाबीनच्या किमतीवर परिणाम होत असतो.





जागतिक सोयाबीन उत्पादन २०२५-२६ मधील ४२९२ लाख टनांवरून २०२६-२७ मध्ये ४४१५ लाख टनांपर्यंत वाढण्याचा अंदाज असून, ही २.९% वार्षिक वाढ दर्शविते. उत्पादनातील वाढीमुळे जागतिक पुरवठा मजबूत होऊन आंतरराष्ट्रीय सोयाबीन किमतींवर दबाव येऊ शकतो. (स्त्रोत: WASDE, जुलै २०२६)





सोयाबीन प्रोसेसर्स असोसिएशन ऑफ इंडिया (SOPA) च्या अंदाजानुसार, विपणन वर्ष २०२५- २६ मध्ये भारतातील सोयाबीन उत्पादन १५१.८ लाख टन राहण्याचा अंदाज असून, हे मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे १६ टक्क्यांनी अधिक आहे.





भारताच्या सोयामील निर्यात २०२३-२४ मधील १९.७ लाख टनांवरून २०२५-२६ मध्ये ८.५ लाख टनांपर्यंत घटण्याचा अंदाज आहे. तथापि, वाढीव उत्पादन आणि उपलब्धतेमुळे २०२६-२७ मध्ये निर्यात १०.० लाख टनांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. (स्त्रोत: WASDE, जुलै २०२६)




भारताची २०२५-२६ मधील ४६.५ लाख टनांच्या तुलनेत २०२६-२७ मध्ये सोयाबीन तेलाची आयात ३.२% ने घटून ४५ लाख टन राहण्याचा अंदाज आहे. ही किरकोळ घट अपेक्षित असली तरी देशांतर्गत खाद्यतेलाचा पुरवठा समाधानकारक राहण्याची शक्यता आहे. (स्त्रोत: WASDE, जुलै २०२६)




भारतात सोयाबीन आवक उच्चांकानंतर हळूहळू घटत जाऊन जून २०२६ मध्ये सुमारे २.८१ लाख टनांवर आली. हंगामी स्वरूपामुळे आवकेत झालेली ही घट बाजारातील पुरवठा कमी होत असल्याचे दर्शवित असून, आगामी काळात सोयाबीन दरांना आधार मिळण्याची अपेक्षा आहे.(स्त्रोत: Agmarknet)




२०२५-२६ हंगामात लातूर (APMC) बाजारातील सोयाबीन दरांमध्ये सातत्याने वाढ होऊन जुलैमध्ये सरासरी दर ₹७,०८९ प्रति क्विंटल झाला, जो २०२६-२७ या विपणन वर्षासाठी निश्चित करण्यात आलेल्या ₹५,७०८ प्रति क्विंटल MSP पेक्षा लक्षणीय अधिक आहे. प्रक्रिया उद्योगांची मजबूत मागणी, चांगली क्रशिंग क्षमता आणि सकारात्मक बाजारभावनेमुळे दरांना भक्कम आधार मिळाला आहे. आगामी काळातही स्थिर मागणी आणि हंगामी आवकेत घट यामुळे सोयाबीन दर स्थिर ते किंचित वाढीच्या दिशेने राहण्याची अपेक्षा आहे. तथापि, देशांतर्गत उपलब्धता आणि जागतिक पुरवठा वाढल्यास दरवाढीचा वेग मर्यादित राहू शकतो.( स्त्रोत: Agmarknet).


मागील तीन वर्षातील ऑगस्ट महिन्यातील सरासरी किंमती खालील प्रमाणे होत्या:
ऑगस्ट २०२३: रु. ४,८४३ प्रति क्विंटल.
ऑगस्ट २०२४: रु. ४,५७१ प्रति क्विंटल.
ऑगस्ट २०२५: रु. ४,६७८ प्रति क्विंटल.

# कापसाच्या किमतींमध्ये वाढीचा कल


## ऑगस्ट २०२६ साठीचा किंमत अंदाज : रु. ८४३० ते ८९६० प्रति क्विंटल




**कापूस** हे भारतातील सर्वात महत्त्वाचे व्यावसायिक पीक आहे, जे 'व्हाइट-गोल्ड' म्हणून ओळखले जाते. जागतिक स्तरावर चीन आणि यूएसए नंतर भारत हा कापूस उत्पादन करणारा प्रमुख देश असून एकूण जागतिक कापूस उत्पादनापैकी २५% वाटा भारताचा आहे.




अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार, सन २०२६-२७ मध्ये जागतिक उत्पादन १४८५ लाख गाठी होईल असा अंदाज आहे. मागील वर्षीच्या तुलनेत २०२६-२७ मध्ये कापसाच्या उत्पादन २.८१ टक्क्यांनी घट होण्याचा अंदाज आहे.





अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार, सन २०२५-२६ मध्ये कापूस निर्यात १९.२३ लाख गाठी असल्याचा अंदाज आहे, जी मागील वर्षाच्या तुलनेत १३.६५ टक्क्यांनी वाढली आहे आणि २०२५-२६ मध्ये आयात ३२.०२ लाख गाठी असल्याचा अंदाज आहे, जी मागील वर्षाच्या तुलनेत १७.८७ टक्क्यांनी कमी आहे.





USDA-FAS मुंबईच्या अंदाजानुसार विपणन वर्ष २०२६-२७ मध्ये भारतातील कापूस उत्पादन ३०७ लक्ष गाठी होण्याच्या अंदाज वर्तवला आहे, जे मागील वर्षाच्या तुलनेत ०.६५ टक्क्यांनी वाढणार आहे.


(स्रोत:USDA-Cotton Outlook)




देशात चालू वर्षीच्या जून २०२६ मध्ये कापसाची आवक मागील वर्षीच्या जून २०२५ च्या तुलनेत २४.५८ टक्क्यांनी घटली आहे.




केंद्र शासनाच्या कृषी विभागाच्या तिसऱ्या अग्रीम अन्नधान्य उत्पादन अंदाजानुसार राज्यात सन २०२५-२६ मध्ये एकूण कापसाचे उत्पादन मागील वर्षीच्या (२०२४-२५) तुलनेत ५.१८ टक्क्यांनी वाढ होण्याचा अंदाज आहे.




*** माहे जुलै २०२६ ची किंमत (दि. १८ जुलै पर्यंतची आहे.)**

मागील तीन वर्षातील अकोला बाजारातील कापसाच्या ऑगस्ट महिन्यातील सरासरी किंमती पुढील प्रमाणे.

ऑगस्ट २०२३ - रुपये ७६५६ प्रति क्विंटल
ऑगस्ट २०२४ - रुपये ७६६९ प्रति क्विंटल
ऑगस्ट २०२५ - रुपये ८०४५ प्रति क्विंटल

खरीप हंगाम २०२६-२७ साठी किमान आधारभूत किंमत (MSP) रु. ८२६७ (मध्यम धागा) प्रती क्विंटल जाहीर करण्यात आली आहे.

टीप: *सदर अहवाल हा बाजाराची सद्यस्थिती व भविष्यकालीन किंमतीविषयक अनुमान दर्शितो. आंतरराष्ट्रीय किंमती, हवामान, आर्थिक घटक, आणि सरकारी धोरण यामध्ये होणाऱ्या बदलामुळे संभाव्य किंमतीमध्ये बदल होऊ शकतो. परिणामी वास्तविक किंमती या संभाव्य किंमती पेक्षा वेगळ्या असू शकतात. त्यामुळे वाचकांनी या अहवालाचा काळजीपूर्वक वापर करावा.*

हा QR कोड स्कॅन करून
व्हॉट्सऍपवर कनेक्ट व्हा
लिंक – tinyurl.com/29fve7jb

---

अधिक माहितीसाठी

## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष

प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) कृषी

**मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प**

शेती महामंडळ भवन, २७०, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग,
सिम्बायोसिस कॉलेज समोर, गोखले नगर, पुणे- ४११०१६

फोन : **020-25656577**, टोल फ्री क्रमांक: **1800-210-1770**

ई-मेल : market.intelligence.smart@gmail.com

वेबसाईट : smart-mh.org